DTE CODE : MB6105

महाराष्ट्र शासन

क्रमांक:पीईसी २०९५/ ५०२६५[६७२०] तांशि १

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२
दिनांक:- 27 जानेवारी, १९९५.

प्रति,
संचालक,
डॉ.विखे पाटील फाऊन्डेशनचे
सेंटर फॉर मॅनेजमेन्ट रीसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट
पत्रकार नगर जवळ, सेनापती बापट मार्ग,
पुणे-४११०५३

| | |
|---|---|
| INWARD NO. | : 325 /95 |
| DATE | : 28-01-95 |
| ADMN. DIRECTOR | : |
| DI | : |
| | : |
| | : U-16 |

विषय:- एम.बी.ए.आणि एम.सी.एम.
अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढविण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भातील आपल्या दिनांक २६ डिसेंबर, १९९४ च्या पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, राज्यात कोणताही पदवी/पदविका अभ्यासक्रम सुरू करावयाचा असल्यास संबंधित संस्थेचा प्रस्ताव अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे राज्य शासनाच्या शिफारशीसह प्राप्त होणे आवश्यक आहे. तसेच आता दिनांक २२ जुलै, १९९४ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या नियम ८२[३] अन्वये, नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु करावयाचा असल्यास वा पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढवावयाची असल्यास संबंधित प्रस्तावास प्रथम संबंधित विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे. करिता, आपण आपल्या प्रस्तावास पुणे विद्यापीठाची मान्यता मिळवावी व विद्यापीठाच्या मान्यतेच्या पत्राच्या प्रतीसह व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या नमुन्यात आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून आपला प्रस्ताव ७ प्रतीत संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांजकडे पाठवावा.

आपला विश्वासू,

[ सु. अ. सांगोलेकर ]
कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन

DIRECTOR
PRAVARA CENTRE FOR MANAGEMENT
RESEARCH & DEVELOPMENT
OFF SENAPATI BAPAT ROAD,